औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

468 **"बां ध का मा चा प र वा ना"** अ.क्र. 11684

COMMENCEMENT CERTIFICATE

बुक नंबर :-

सुधारित बांधकाम परवानगी

परवाना क्रमांक : 535/2021-22

फाईल क्रमांक : 366/१७/२०21-22 दिनांक 18/10 /२०21

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद नगर रचना विभाग

परवाना धारण करणाऱ्याचे नांव :- श्रीमती/श्री. नविनकुमार विजयकुमार पाठणी

एन-एम-1, सिडको

न.भू.क्र./सर्व्हे क्र./गट क्र. 125/पैकी भू.क्र. 54 मोहल्ला :- शिवाजीनगर, सातारा औरंगाबाद

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व तत्संबंधित नियमास अनुसरून खालीलप्रमाणे बांधकामाची/दुरुस्तीची परवानगी दिली जाते, सदरील परवान्याचा अंमल आज तारखेपासून एक वर्षापर्यंत राहील. बांधकाम पूर्ण झाल्या बाबत लेखी माहिती तपासणीसाठी या कार्यालयात पाठविण्यात यावी नगर रचनाकार यांनी लाल रंगाने दुरुस्ती/मान्य केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकामाची परवानगी खालील अटीवर दिली जाते.

०१. सदर बांधकाम परवाना हा विकास परवानगीच्या अनुषंगाने दिला जात आहे. या मध्ये नमुद केलेल्या भुखंडासंबंधी कोणाचे मालकी हक्क, इजमेंट हक्क, अगर इतर कोणत्याही हित संबंधात बाधा निर्माण होत असतील तर त्यांनी आपल्या तक्रारी/वाद न्यायालयामार्फत परस्पर दूर करून घ्याव्यात या संबंधाने उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबीची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

०२. शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कास बाधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येवू नये.

०३. प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी नगर भूमापन अधिकारी/तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्या मार्फत भूखंड आखणी करून घेणे अर्जदार व वास्तुविशारद यांच्यावर बंधनकारक राहील.

०४. सदर भूखंडास/मिळकतीस मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत म.ज.म.अधि.१९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक वापराचा आदेश क्र. सिडको दिनांक / /२० नुसार प्राप्त आहे.

०५. बांधकाम साहित्य व माती महानगरपालिकेच्या रस्त्यावर ठेवू नये याबाबत दिनांक 4/8/2021 रोजी दिलेले हमीपत्र अर्जदारास बंधनकारक राहील. तसेच ईमारतीचे बांधकाम करतांना संपूर्ण ईमारतीस जाळीव्दारे बंधीस्त करूनच बांधकाम करावे.

०६. या कार्यालयाचे संबंधित अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणीसाठी आले असता त्याचे अवलोकनार्थ मंजूरीचे संबंधीत कागदपत्रे दाखविण्यात यावे.

०७. जोत्या पर्यंत **(Piinth Level)** चे बांधकाम झाल्यानंतर सदरहु कार्यालयास त्याप्रमाणे अधिकृत वास्तुविशारदच्या प्रमाणपत्रासह कळवावे व **Piinth Level Comletion** प्रमाणपत्र कार्यालयातर्फे घेणे आवश्यक आहे.

०८. मंजूर बांधकाम नकाशाच्या विरूद्ध जर बांधकाम करण्यात आले तर आपणा विरूद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम–४३ सह ५२, कलम–५४, कलम–५३ प्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात येईल.

०९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६३ अन्वये बांधकाम पुर्ण झाल्या नंतर **भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)** घेण्यात यावे व त्या नंतरच इमारतीचा वापर सुरू करावा नसता आपल्या विरुद्ध म.प्रा.नि.व.न.र.अधि १९६६ चे कलम –५३ अन्वये पूढील कार्यवाही करण्यात येईल.

१०. भोगवटा प्रमाणपत्र घेतेवेळी महानगरपालिका परवानाधारक प्लंबरने जलनि:सारण जोडणी बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी संकलीत करून विंधन विहीर असल्यास त्यांचे पुर्नभरण करावे. जेथे विंधन विहीर नाही अशा ठिकाणी सोकपीट (शोशकुप) तयार करून त्यामध्ये त्याचा निचरा करावा.

१२. शहर विकास निंधी रक्कम रू. 2,84,500/- च.क्र. 27701 दिनांक 01/10/2021 नुसार जमा केली आहे.

१३. प्रिमियम रक्कम रू. 11,93,500/- च.क्र. 27702 दिनांक 01/10/2021 नुसार जमा केली आहे.

१४. ~~विकास खर्च निधी रक्कम रू.~~ Special F.S.I. 7,00,600/- च.क्र. 27703 दिनांक 01/10/2021 नुसार जमा केली आहे.

१५. ~~जमिन विकास शुल्क रक्कम रू.~~ Premium Ancillary 8350/- च.क्र. 27704 दिनांक 01/10/2021 नुसार जमा केली आहे. C.B.P. Recpt

१६. भोगवटा प्रमाणपत्र घेणे पूर्वी समासातील अंतरामध्ये कमीत कमी (07) झाडे लावून त्यांचे संगोपन करावे.

१७. जागेवरील झाडे तोडावयाची झाल्यास प्रथम सक्षम प्राधिकरणा मार्फत परवानगी घेण्यात यावी.

१८. जागेवर विद्युत वाहिनी असल्यास ती प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी संबंधीत खात्याकडून काढून घ्यावी नंतरच बांधकाम सुरू करावे.

१९. भोगवटा प्रमाणपत्रं घेण्यापूर्वी / जोत्याचे प्रमाणपत्र घेण्यापूर्वी स्वतंत्र पी.आर.कार्ड/एकत्रित पी.आर.कार्ड व टोच नकाशा सादर करावा.

२०. सद्यस्थितीत महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणे शक्य नाही, जेव्हा महानगरपालिकेकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल त्यावेळी. आपणास पाणी पुरवठा करणे शक्य होईल. तरी पाणी पुरवठा बाबत अर्जदारास आग्रह धरता येणार नाही.

२१. अर्जदार यांनी ईमारतीचे बांधकाम करतांना म.न.पा चे उपलब्ध (S.T.P.) केंद्रातील प्रक्रीया युक्त पाण्याचा वापर करावा.

२२. ~~जा.क्र./सिडको/प्र.शा./औ.बाद/भू.आ.वि./२०21 दिनांक 13/07/2021 नुसार~~ कार्यालयाकडुन ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यानुसार मालकी हक्कप्राप्त धरून बांधकाम परवानगी देण्यात ये बांधकाम परवानगीसाठी

(23) सदर भूखंडावर यापूर्वी बां.प.प्रकरण क्र.-15/17/2016-17 बां.प.क्र.-588/2016-17 दि 04/10/16 दिलेली होती.

[redacted] प्र.रचनाकार,

औरंगाबाद महानगरपालिका,

यांचे करीता.

D.C. Signed By D.D.T.P.

तजवीज दिनांक : 24/09/2021

प्रतिलिपी, :-०१ मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर. P.T.O.

०२ प्रशासकीय अधिकारी विभाग क्रमांक ~~अ, ब, क, ड, ई, म फ~~ यांना माहितीस्तव ~~योग्य कार्यवाहीस्तव~~ दिली जात.

TP-02, VII.